बहुतांच्या कामास यावे ।
बहुतांच्या सुखी सुखावे ॥

महाराष्ट्र शासन
धाराशिव जिल्हा परिषद, धाराशिव
जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राज्य महामार्ग क्र.211,धाराशिव 413501
दूरध्वनी 02472-226840 ईमेल ceozpdharashiv@gmail.com, CEOZP.dharashiv@maharashtra.gov.in वेब https://www.zposmanabad.gov.in

जा.क्र.जिपधा.मुकाअ.स्वीय.85 दिनांक 15.02.2024

वाचा :- 1) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय दि.7 ऑक्टोबर 2017,
शासन शुध्दीपत्रक दि.6 सप्टेंबर 2021, शासन शुध्दीपत्रक दि.8 ऑक्टोबर 2021.
2) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन निर्णय दि.23 सप्टेंबर 2013

**जिल्हा परिषद अंतर्गत विविध विकास कामे/ योजनांच्या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपध्दती.**

=========================

**परिपत्रक**

जिल्हा परिषद अंतर्गत विकास कामे गतीने होणे तसेच नियोजित वेळेत निधी खर्च होणेस्तव व अकारण कागदोपत्री तसेच वेळेचा अपव्यय टाळणे हेतू मी, डॉ.मैनाक घोष, भा.प्र.से., मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.धाराशिव खालीलप्रमाणे विकास कामांच्या अनुषंगाने कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

♦**प्रशासकीय मान्यता घेणे** :- मंजूर नियतव्ययाच्या मर्यादेत एखाद्या विभागाने शासन निर्णयानुसार प्राधान्यक्रमाने निवडलेल्या कामांना संबंधीत विषय समितीमध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 109 नुसार मान्यता घेतल्यानंतर वरील वाचा मध्ये नमूद शासन निर्णयातील आर्थिक मर्यादेनुसार त्या विभागाने प्रशासकीय मान्यता घेण्याबाबत कार्यवाही अनुसरावी.

♦**निविदा प्रसिध्दी करणे** :- वरीलप्रमाणे प्रशासकीय मान्यतेनुसार प्राप्त कार्यान्वयीन यंत्रणेच्या स्तरावर शासन निर्णयातील वेळोवेळी निर्गमीत मार्गदर्शक सूचनांनुसार काटेकोरपणे पालन करुन कार्यान्वनीय यंत्रणा खाते प्रमुखांच्या स्तरावर निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही पार पाडावी.

♦**निविदाधारक पात्र/अपात्रता बाबत** :- निविदा कालावधी पूर्ण झाल्यास कार्यान्वयीन यंत्रणेत अधिनस्त तांत्रिक समितीने संबंधीत निविदाधारकाची निविदा तपासून त्यानुसार पात्रतेबाबतचा तपशील जिल्ह्याचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा.

♦**निविदा निश्चित करणे** :- कार्यान्वयीन यंत्रणेने पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार पात्र निविदाधारकांचे देकार (Financial Bid) उघडून वरील वाचा मध्ये नमूद शासन निर्णयातील अधिकारानुसार निविदा स्विकारण्याची संचिका अर्थ विभागाच्या सहमतीने संबंधीत स्तरावरुन सादर करण्याची दक्षता घ्यावी.

वरीलप्रमाणे परिपत्रकाची नोंद सर्व खाते प्रमुखांनी घेवून कार्यवाही अनुसरावी.

पत्रक पाठवले........
दिनांक..16/2/24.......
सही.........

**(डॉ.मैनाक घोष) भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद, धाराशिव

स्वीय सहायक

**प्रतिलिपी आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

1.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.धाराशिव
2.प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, धाराशिव
3.सर्व खाते प्रमुख, जि.प.धाराशिव
4.गट विकास अधिकारी (सर्व), पंचायत समिती जि.धाराशिव

***